OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट :- दिनांक -२६/११/२०२५

---

प्रति,

मा.संपादक,

दैनिक----------------

विषय :- एमआयडीसी पो.स्टे. हद्दीत बॅग लिफ्टींग करणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात ८,००,०००/- रु रोख रक्कम हस्तगत.

---०००-----

दि.१५/११/२०२५ रोजी फिर्यादी नामे विलास मधुकर जाधव वय ६७ वर्ष रा. जुनी जोशी कॉलनी, जळगांव यांनी दिलेल्या फिर्यादवरुन एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ८४१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) प्रमाणे अज्ञात आरोपी यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधीक्षक सो. जळगांव यांनी सदर गुन्हा उघडकीस आणणे बाबत स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ट पोलीस निरीक्षक, यांना आदेशीत केले होते.

त्यानुसार मा. श्री राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव येथील अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना दि.२३/११/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय माहिती व तांत्रिक विश्लेषण करुन गुन्हयातील आरोपी नामे

१) विजय शांताराम पाटील वय ४१ वर्ष रा. कलावसंत नगर, जळगांव

२) जितेंद्र छोटुलाल जाधव वय ४४ वर्ष रा. ज्ञानदेव नगर, जुना खेडी रोड, जळगांव

यांना ताब्यात घेवुन त्यांनी फिर्यादी यांचे ताब्यातुन हिसकावुन नेलेली ८,००,०००/- रु ची रोख रक्कम त्यांचेकडुन हस्तगत करण्यात आली आहे. नमुद आरोपी यांना गुन्हयाचे पुढील तपासकामी एमआयडीसी यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास एमआयडीसी पो.स्टे. करीत आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री डॉ महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव, मा. श्री. अशोक नखाते,अपर पोलीस अधीक्षक, जळगांव परिमंडळ, मा. श्री नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगांव उपविभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे, वरिष्ट पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, तसेच पोउपनि. शरद बागल, सोपान गोरे, पोहेकॉ/ प्रविण भालेराव, मुरलीधर धनगर,सलीम तडवी, पोकॉ/सिध्देश्वर डापकर, रतनहरी गिते, मयुर निकम, सचिन घुगे, प्रदीप सपकाळे सर्व स्थागुशा जळगांव तसेच नेत्रम येथील पोकॉ/पंकज खडसे,पोकॉ/मुबारक देशमुख, पोकॉ/ कुंदनसिंग बयास व सायबर येथील पोकॉ/ गौरव पाटील, मिलींद जाधव यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस

